# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०८/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## लोहा चॅनलची चोरी करणारे आरोपींना केले अटक

दिनांक २८/०८/२०२४ रोजी सनविजय रूलींग एंड इंजिनियरींग कंपनी, टेंभरी एमआयडीसी बोरी कंपनीमध्ये काम करणाऱ्या आरोपी नोकराने कंपनीतील माल ८.१२० मिटरचे ९०० किलो वजनाचे ०५ नग किंमत ५००००/— रू चा लोहा चॅनलची चोरी करून ट्रकमध्ये भरले अशा फिर्यादी नामे— प्रशांत मधुकर गायकी वय ४९ वर्ष प्लॉट नं. १८ काशीनगर नागपूर यांचे रिपोर्ट वरून पोस्टे एमआयडीसी बोरी येथे अप क्र. २५७/२४ कलम ३०६, ३(५) बीएनएस अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयाचे तपासात गुन्हा दाखल होताच पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथील स्टाफ यांनी घटनास्थळी जावुन यातील **आरोपी नामे— १) जितेंद्र यशवंत बघेल वय ३६ वर्ष रा. घाटरोहना ता. पारशिवनी जि. नागपुर २) सलमान मोहम्मद सय्यद अली खान वय २६ वर्ष रा. बभनबाव पोस्टे नरहरपुर जि. गोंडा उ. प.** यांना ताब्यात घेवुन आरोपीकडुन कंपनीमधून चोरी केलेला जास्तीचा ८.१२० मिटरचे ९०० किलो वजनाचे ०५ नग लोहा चॅनल किंमती ५०,०००/—रू. चा मुद्देमाल व कंटेनर ट्रक क्र. MH-40/Y-0557 किंमती १५,००,०००/—रू. असा एकुण १५,५०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीतांना दिनांक २९/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्रीमती पूजा गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे एमआयडीसी बोरी येथील ठाणेदार पोनि सतिशसिंग राजपूत, DB पथकाचे Psi खोत, पोलीस अंमलदार लक्ष्मण बंने, दीप पांडे, श्रीकांत गौरकर, पूजा इंगळे यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर